# <u>कळेना</u>

बाबा पाहा तुमच्या अंगीचा बनियन
छिद्रांनी आहे त्याची केली कशी चाळण ||१||

सदराही तुमचा किती आहे फाटला
रंग मुंडास्याचा आहे पुरता विरला ||२||

लुगड्याला आईच्या तर किती ठिगळं
जोडवं ना पायी गळा दोऱ्याचं डोरलं ||३||

धडोतं दादाचं मग कसं नवं कोरं
कळेना नवा माझाही कसा परकर ||४||

– नारायण
०८/११/२३